दि. ०५ मे, २०२६

# जाहीर प्रकटन

**विषय** : विद्यापीठाचा १२७ वा पदवी प्रदान समारंभ : अर्ज करण्याचा कालावधी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या १२७ व्या पदवीप्रदान समारंभाचे आयोजन जून/जुलै, २०२६ दरम्यान करण्यात येणार आहे. त्यात **ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२५ मध्ये उत्तीर्ण** झालेल्या विद्यार्थ्यांना, तसेच **दूरस्थ अभ्यासक्रमाचे एप्रिल/मे, २०२५ व ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२५ मध्ये उत्तीर्ण** विद्यार्थ्यांना पदवी/पदविका प्रदान करण्यात येणार आहेत. त्याअनुषंगाने उपरोक्त परीक्षांमध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी पदवी/पदविका आणि पदव्युत्तर प्रमाणपत्रांसाठी ऑनलाईन अर्ज करावेत. त्यासाठीचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे देण्यात येत आहे.

**ऑनलाईन अर्ज स्विकारण्याचा कालावधी –**

| | |
|---|---|
| **ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२५,<br>दूरस्थ अभ्यासक्रम एप्रिल/मे, २०२५** | दिनांक ०८ मे, २०२६ ते ३१ मे, २०२६ ( विनाविलंब शुल्क ) |
| | दिनांक ०१ जून, २०२६ ते १५ जून, २०२६ ( विलंब शुल्कासह ) |

उपरोक्त परीक्षांमध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज व त्यासाठीचे शुल्क भरता येईल. पदवी/पदविका प्रमाणपत्र मिळण्याकरिता ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर विद्यार्थ्यांनी **अर्जासोबत मूळ गुणपत्रिका अपलोड** करणे आवश्यक आहे.

**महत्त्वाची टीप :**

**तसेच एप्रिल/मे, २०२५ पूर्वीच्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी पुरवणी (Supplementary)/दुय्यम (Duplicate) पदवी/पदविका प्रमाणपत्र अर्जासह शुल्क भरण्याची लिंक कायमस्वरूपी सुरू आहे. संबंधित विद्यार्थ्यांनी नियमित पदवीप्रदान (127th Regular Convocation) समारंभाच्या लिंकवर शुल्क न भरता ते त्यांनी पुरवणी/दुय्यम पदवी/पदविका प्रमाणपत्र लिंक वरूनच अर्ज करावेत.**

प्रभारी संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ